# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**दुपार**

---

**दिनांक १५.०७.२०२६ बुधवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक १४.०७.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये १२ केसेसमध्ये १४ ईसमांवर कारवाई करून २२,६६२/—रू. चा मुद्‌देमाल जप्त केला आहे. तसेच, जुगार कायद्यान्वये ०१ केसेसमध्ये ०६ ईसमांवर कारवाई करून २,०१,४००/—रू. चा मुद्‌देमाल जप्त केला आहे.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली ३,००५ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. २,४९,१५०/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गिट्टीखदान पोलीसांची कामगीरी :— वाहन चोरी करणाऱ्या सराईत आरोपीस अवघ्या ०४ तासात अटक.**

दिनांक १३.०७.२०२६ चे २२.३० वा. ते दि. १४.०७.२०२६ चे ०८.३० वा. चे दरम्यान, फिर्यादी शेख अमीर शेख मोहम्मद, वय ३० वर्षे, रा. गौतम नगर गिट्टीखदान नागपूर यांनी त्यांचा काळ्या रंगाचा बजाज ऑटो क्र. एम.एच. ३१ एफ.बी.०२०७ किंमती अंदाजे ७०,०००/—रू. चा पोलीस ठाणे गिट्टीखदान हद्दीतील सुनिल फर्निचर गोरेवाडा रोड भारत पेट्रोलपंपसमोर गिट्टीखदान येथे पार्क करून, लॉक करून ठेवला असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचा ऑटो चोरून नेला. अशा फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे गिट्टीखदान येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्हयाचे तपासात पोलीस ठाणे गिट्टीखदान येथील अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रीक तपास करून व मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून आरोपीस निष्पन्न केले. आरोपीवर पाळत ठेवून व सापळा रचून, आरोपी नामे निलेश राजेंद्र सोनवाणे, वय २६ वर्षे, रा. झिंगाबाई टाकळी, काली माता मंदीर मागे, लक्ष्मी नगर, गोधनी रोड मानकापूर, नागपूर यास ताब्यात घेवुन विचारपुस केली असता, त्याने वर नमुद वाहन चोरीचा गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपीचे ताब्यातुन चोरीस गेलेला ऑटो किंमती ७०,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीचा गुन्हे अभिलेख तपासला असता, तो ऑटो चोरीचे गुन्ह्यात सराईत आरोपी असल्याचे दिसुन झाले. आरोपीस अवघ्या ०४ तासात अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्रीमती विनीता शाहु, अपर पोलीस आयुक्त (उत्तर प्रभाग), मा. श्रीमती अन्नपुर्णा सिंह, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. २), मा. श्री. सुहास जगताप, सहा. पोलीस आयुक्त (सदर विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि. श्रीमती. ललिता तोडासे, सपोनि. बालाजी लालपालवाले, पोहवा. अजय यादव, दिनेश आगरकर, विशाल नांदेकर, पोअं. आकाश लोथे व नागनाथ कोकरे यांनी केली.



**३) सोनेगाव पोलीसांची कामगिरी :— चोरी करणाऱ्या आरोपींना अटक, एकुण ०५ गुन्हे उघडकीस.**

दिनांक १०.०७.२०२६ चे १९.१० वा. चे सुमारास, फिर्यादी श्रीमती प्रणाली मनोहर शेंद्रे वय ३७ वर्षे रा. प्लॉट न. १७४, एच.बी. इस्टेट, सोनेगाव, नागपूर ह्या त्यांचे युनियन बॅक ऑफ इंडीया येथील ड्युटी पुर्ण करून, बॅकेचे तिजोरीची चाबी, आय कार्ड, पोको कंपनीचा मोबाईल, क्रेडीट व डेबिट कार्ड तसेच ३,०००/— रू. रोख असा एकुण ११,०००/— रू. चा मुद्देमाल त्यांचे टि.व्हि.एस.ज्युपिट मोपेड चे डिक्कीमध्ये ठेवून पोलीस ठाणे सोनेगाव हद्दीतील घराजवळील सोनेगाव तलाव येथे मोपेड लॉक करून, पार्क करून, घरामध्ये गेल्या. वेळ १९.२५ वा. चे सुमारास फिर्यादी यांनी बाहेर येवून गाडीची डिक्कीमधून साहित्य काढण्याकरीता डिक्की उघडली असता, त्यामध्ये ठेवलेला मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याचे त्यांना दिसून आले. अशा फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे सोनेगाव येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

नमुद गुन्ह्याचे तपासात, सोनेगाव पोलीसांनी तांत्रिक तपास करून, मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, सापळा रचून, क्र. १) आरोपी रोशन अशोक बोबडे, वय ४० वर्षे रा. प्लॉट क्र. ०२, गोपाल नगर, तीसरा बस स्टॉप जवळ प्रतापनगर, नागपुर २) मंगेश सुधाकर तरार, वय ४३ वर्षे, दोन्ही रा. प्लॉट क्र. ६०, गोपाल नगर, तीसरा बस स्टॉप जवळ प्रतापनगर, नागपुर यांना ताब्यात घेवून विचारपूस केली असता, त्यांनी वर नमुद गुन्हा संगणमताने केल्याची कबुली दिली. आरोपींना अधिक विचारपूस केली असता, वर नमुद गुन्ह्याव्यतिरिक्त पोलीस ठाणे सोनेगाव, सक्करदरा, हुडकेश्वर व सदर हद्दीत प्रत्येकी एक याप्रमाणे एकुण ०५ चोरी तथा वाहन चोरीचे गुन्हे केल्याचे सांगितले. आरोपींचे ताब्यातुन १) होन्डा ॲक्टीवा मोपेड क्र. एमएच ३१ बीझेड २१५, २) होन्डा ॲक्टीवा मोपेड क्र. एमएच ४९ टी ७३३० ३) होन्डा ॲक्टीवा मोपेड क्र. एमएच ३१ डीई ९६३६ ४) सुझूकी ॲक्सेस मोपेड क्र. एमएच ३१ ईएक्स ४२७२, ५) होन्डा ॲक्टीवा मोपेड क्र. एमएच ४९ एएम ३०४६ असे एकुण ०५ वाहने किंमती २,५१,५००/—रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींना अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग) नागपूर शहर, मा. श्री ऋषिकेश रेड्डी सिंगा रेड्डी, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. १), मा. श्री. यशवंत नलावडे, सहा. पोलीस आयुक्त (सोनेगाव विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. राहुल तसरे, पोउपनि. विक्रांत कारटकर, पोहवा. विकास टोंग, हिंमत शहारे, राजेश मसराम, मंगेश गाडगे, दिनेश खेडकर, पोअं. वैभव लबडे, गगणकुमार हारगुडे यांनी केली.

**४) पाचपावली पोलीसांची कामगिरी :— घातक शस्त्रसह विधीसंघर्षित बालक ताब्यात. वाहन चोरीचे ०२ गुन्हे उघडकीस.**

दिनांक ११.०७.२०२६ चे २०.०० वा. चे सुमारास, पाचपावली पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना मोतीबाग शिव मंदीर जवळ, पाचपावली येथे एक विधीसंघर्षित बालक हा

होन्डा ॲक्टीवा मोपेड क्र. एमएच ४९ बीवाय ११६३ ने संशयीतरित्या जातांना दिसून आला. त्यास थांबवून पंचासमक्ष त्याचे ताब्यातील वाहनाची झडती घेतली असता, गाडीचे पायदान खाली एक लोखंडी चाकु किंमती अंदाजे ३००/—रू. चा मुद्देमाल मिळुन आल्याने, जप्त करण्यात आला. विधीसंघर्षित बालक हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने शस्त्र बाळगुन समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, त्यास पोलीस ठाणे येथे आणून त्याचेविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला

विधीसंघर्षित बालकास अधिक विचारपूस केली असता, त्याने पोलीस ठाणे कपिलनगर व तहसील हद्दीत वाहनचोरी केल्याचे सांगीतले. पोलीस ठाणे गुन्हे अभिलेख पडताळणी केली असता, पोलीस ठाणे कपिलनगर व तहसील हद्दीत वाहन चोरीचे गुन्हे दाखल असल्याचे निष्पन्न झाले. विधीसंघर्षीत बालकाचे ताब्यातून ०२ चोरीचे वाहने व एक लोखंडी चाकू असा एकुण १,१५,३००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्रीमती. विनीता शाहु, अपर पोलीस आयुक्त (उत्तर प्रभाग) नागपूर शहर, मा. श्री. राहुल मदने, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. ३), मा. श्री. शिप्रसाद पारवे, सहा. पोलीस आयुक्त (लकडगंज विभाग), वपोनि. अनिरूध्द पुरी यांचे मार्गदर्शनाखाली पोनि. गुन्हे विवेक पडघण, पोउपनि. रंजीत माजगावकर, पोंहवा. रविंद्र राऊत, मुकेश यादव, सुशिल रेवतकर, राजकुमार पाल, पोअं. युनुस खान व अमित ठाकुर यांनी केली.



**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे राणाप्रतापनगर :— हद्पार ईसमास अटक.**

दिनांक १४.०७.२०२६ रोजी राणाप्रतापनगर पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहीती मिळाली की, राणाप्रतापनगर चौक येथे एक हद्दपार इसम हा येणाऱ्या—जाणाऱ्या लोकांना शिवीगाळ करून धूमधाम करीत आहे. अशा मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, नमुद ठिकाणी गेले असता, तेथे मिळालेल्या वर्णनाचा ईसम धुमधाम करतांना दिसुन आला. तो पोलीसांना पाहुन पळुन जाण्याचे तयारीत असता, त्यास पाठलाग करून ताब्यात घेतले. त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव अभिनव उर्फ दाऊद उकंडराव सोमकुवर, वय २४ वर्षे, रा. प्लॉट नं. २४२, एनआयटी ले—आऊट, त्रिमुर्ती नगर, नागपूर असे सांगीतले. त्यास पोलीस ठाणे येथे आणून गुन्हे अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०१ यांचे हद्दपार आदेश क्र. ०८/२०२४ दिनांक १२.११.२०२४ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०२ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी गुन्हा करण्याचे उद्देशाने समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे

उल्लंघन केल्याने, फिर्यादी पोअं. अंकुश कनोजीया यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे राणाप्रतापनगर येथे आरोपीविरूध्द कलम १४२ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे पारडी :— चोरी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

फिर्यादी डॉ. आशिष अशोक जैन, वय ४२ वर्षे, रा. प्लॉट नं. १६, साईलिला बिल्डींग, मानकर वाडी, पुनापूर रोड, पारडी, नागपुर यांचा दवाखाना पोलीस ठाणे पारडी हद्दीत, १६, किर्तीधर सोसायटी, गंगाबाग, एनआयटी गार्डन जवळ, नागपुर येथे आहे. दवाखान्यातील इलेक्ट्रीक फिटींगचे काम आरोपी नामे अंकीत बोपचे, वय ३० वर्षे, रा. जरीपटका, नागपूर यास ठेके स्वरूपात दिले होते. दिनांक ०१.०४.२०२६ चे १०.०० वा. ते २०.०५.२०२६ चे १०.०० वा. दरम्यान, इलेक्ट्रीक फिटींगकरीता लागणारे वेगवेगळे एम.एम.चे इलेक्ट्रीक वायर बंडल एकुण किंमती १,८२,०००/—रू. चा मुद्देमाल फिर्यादीने घटनास्थळी आणून ठेवला होता. नमूद मुद्देमाल हा आरोपीने फिर्यादीस न सांगता चोरून नेला.

अशा फिर्यादी यांनी दिनांक १४.०७.२०२६ रोजी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे पारडी येथे मपोउपनि. मिरा सावंत ९८५०९६२७०२ यांनी आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**पोलीस ठाणे हुडकेश्वर :—** निकीता मोतीलाल ईवनाते, वय २३ वर्षे, रा. ईमलीखेडा, जि. छिंदवाडा (म.प्र.) ह. मु.—प्लॉट नं. २८, फैजान रिअल ईस्टेट, बेसा, निपास सोसायटी घोघली रोड, शौर्या पाटनकर यांचे घरी किरायाने, हुडकेश्वर, नागपूर ह्या दिनांक ०६.०७.२०२६ चे ०१.३० वा. पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **वर्णन** रंग— गोरा, चेहरा— गोल, बांधा— मध्यम, उंची— ५ फुट ५ इंच, केस— काळे लांब, अंगात— काळ्या रंगाचा प्लाझो आणि कुर्ता घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात. ओळख—उजव्या हाताचे अंगठ्यावर जळाल्याचे निशाण आहे.



निकीता

**स्वा/—**
**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**